# प्रकरण ६

## म.वा.देसाई म्युनिसिपल सर्व साधारण रुग्णालय, मालाड (पू.) येथे स्थापित केलेल्या समित्या

(अ) तक्रार निवारण समिती -

विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधि व रुग्णालयातील अधिकारी यांचा या समितीत समावेश आहे. या समितीची स्थापना १९९५ साली झाली. कर्मचा-यांच्या तक्रारीचे निवारण करणे हे हया समितीचे उदिष्ट आहे. दर तीन महिन्यात एकदा सभा होऊन कर्मचारी व व्यवस्थापन यांच्यातील विवाद सोडविण्यात येतात. सभेचा इतिवृत्तांत साक्षांकित करुन त्याच्या प्रति संबंधिताना पाठविण्यात येतात. सर्व सामान्य जनता अथवा त्यांचे प्रतिनिधी या सभेत सहभागी होऊ शकत नाही.

(ब) दक्षता समिती-

या समितीत रुग्णालय व्यवस्थापक, सामाजिक कार्यकर्ते व सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधी यांचा समावेश होतो. रुग्णालय सेवेचा लाभ घेणा-या सर्वसामान्य जनतेच्या समस्या हाताळुन त्यांचे निवारण करणे हे हया समितिचे उद्दीष्ट आहे. प्रमुख समस्या ओळखणे, रुग्णालय व्यवस्थापकांच्या निदर्शनास आणणे व त्यांचे निरसन करणे हे काम ही समिती करते. जनतेबरोबर सुसंवाद साधला जाईल या करीता हया समितीमध्ये प्रमुख वैद्यकिय अधिकारी, वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी, अधिसेविका, मुख्य लिपीक, स्थानिक सामाजिक कार्यकर्ता व स्थानिक नगरसेवकांचे दोन प्रतिनिधी यांचा या समितीत समावेश होतो. प्रत्येक महिन्यात एकदा सभा घेतली जाते. सभेचा इतिवृत्तांत तयार करुन तो अधिसारित केला जातो. सर्वसामान्य जनता हया सभेत प्रत्यक्ष सहभागी होऊ शकत नाही. पण नगरसेवकांमार्फत अप्रत्यक्षपणे सहभागी होऊ शकते.